स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

# जनसंपर्क विभाग

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३** **दि. १७ जानेवारी,२०२३**

**जळगावदि.१७ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभागाद्वारे प्रथमच 'तथागत भगवान बुध्द आणि त्यांचे तत्वज्ञान' हा प्रमाणपत्र शिक्षणक्रम ऑनलाईन पध्दतीने सुरू होत असून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे.**

भगवान बुध्दांचे विचार, तत्वज्ञान आणि कार्य हे ज्ञानावर आधारीत आहे. आपल्याला प्राप्त झालेले ज्ञान लोकांना सांगावे, दु:खापासून मुक्ती मिळविण्याचा मार्ग तथागत बुध्दांनी सांगितला. गौतम बुध्दांचे हे मौलिक विचार समाजाच्या तळागळापर्यंत पोहचावे यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रमाणपत्र शिक्षणक्रम सुरु केला जात आहे. ३० तासांचा हा अभ्यासक्रम असून तज्ञ आणि अनुभवी प्राध्यापकांचे रेकॉर्ड केलेल्या व्हिडीओद्वारे मार्गदर्शन प्राप्त होणार आहे. शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यापीठाकडून अधिकृत प्रमाणपत्र मिळणार आहे. १५ जानेवारी पासून ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे.

**'कवयित्री बहिणाबाई जीवन आणि काव्य' शिक्षणक्रमाचे प्रवेश सुरू**

याच विभागामार्फत कवयित्री बहिणाबाई : जीवन आणि काव्य हा ऑनलाईन प्रमाणपत्र शिक्षणक्रम देखील सुरु झालेला असून त्याची देखील प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरु झाली आहे. ३० तासांचा आणि किमान १५ दिवसात हा शिक्षणक्रम पूर्ण होणार असून शनिवार आणि रवीवार असे दोन दिवस एक तास ऑनलाईन वर्ग होणार आहे. ऑनलाईन पध्दतीने तज्ञ आणि अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळणार असून बहिणाबाईंचे जीवन आणि काव्य याचा परिचय होणार आहे. या दोन्ही शिक्षणक्रमाच्या प्रवेशासाठी व अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७४९५/२२५८४९६ वर संपर्क साधावा. अथवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर संपूर्ण माहिती पाहता येईल, अशी माहिती प्रभारी संचालक डॉ. मनिषा इंदाणी यांनी दिली.

**बातमी नं. २**

**जळगावदि.१७ (प्रतिनीधी) :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रातील हिंदी विभागाचे विभाग प्रमुख व विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.सुनील कुलकर्णी तसेच याच विभागातील डॉ. पुरूषोत्तम पाटील यांची महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक कार्य मंत्रालय, मुंबई यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीवर आगामी तीन वर्षांसाठी जळगाव विभागातून अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रा.सुनील कुलकर्णी हे या अगोदरच्या समितीमध्ये देखील जळगाव विभागातून अशासकीय सदस्य म्हणून नियुक्त होते. या कालावधीत त्यांनी विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये व जळगाव, धुळे, नंदुरबार येथील विविध महाविद्यालयांमध्ये हिंदी साहित्य अकादमीच्या वतीने विविध चर्चासत्र, कार्यशाळा देखील घेतल्या आहेत. या नियुक्तीबद्दल कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील,भाषा अभ्यास प्रशाळेच्या संचालक प्रा.मुक्ता महाजन, संगणकशास्त्र प्रशाळेचे प्रा.मनिष जोशी यांनी अभिनंदन केले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी